# <u>प्रेस नोट</u>

## <u>डॉ. झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजना 2016-17</u>

मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान,गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी, व उर्दु या विषयांचे शिक्षण देणे, मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणा-या इ. 9 वी, इ. 10 वी, इ. 11 वी व इ. 12 वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ होवून त्यांची रोजगार क्षमता वाढून आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत होईल या दृष्टीने मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा, ग्रंथालयांसाठी अनुदान देणे, व शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान देणेची **<u>डॉ. झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजना</u>** राबविणेस शासन निर्णय दिनांक 11.10.2013 अन्वये मंजुरी देणेत आली आहे.

सदर शासन निर्णयात नमूद अटी व शर्ती पूर्ण करणा-या मदरशांनी सदरचे प्रस्ताव **<u>दिनांक 25 जानेवारी 2017 पर्यंत</u> निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी** यांचेकडे सादर करावेत.

**निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी**